# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२०/१०/२०१८
## दि.१९/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६७४/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | कैलास आखुटे,पो.हवा. कोंढवा पो.स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१०/२०१८ रोजी १२/४५ वा.चे सुमारास खडीमशीन चौक ते पिसोळी रोडवर टायणी इंडस्ट्रीज सोसायटी जवळील, हिल टाऊन सोसायटी समोर, कोंढवा बु//, पुणे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी एक अनोळखी इसम वय ३५ वर्षे, यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चेतन मोरे ९८७०३२७७०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३१८/१८,भादविक १४३,३४१,महा.पो.का.क.३७(१)१३५, |
| **फिर्यादी** | प्रविण स्वामी, पो.उप.निरी.बंडगार्डन, पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०१८ रोजी १५/१० वा.चे सुमारास पुणे पोलीस आयुक्त कार्यालय,गेट नं.२ समोर व सार्वजनिक रोडवर पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी कोंढवा पो.स्टे.चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी योगेश टिळेकर यांचे विरोधात गुन्हा दाखल केल्याने त्यांची बदली केली म्हणुन मोर्चा काढुन, मोर्चास पोलीस परवानगी नसताना, तसेच मा.पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था पुणे शहर यांचा जमावबंदीचा आदेश असताना, त्याचा भंग करुन, बेकायदा मोर्चा काढुन साधु वासवाणी चौक ते नेहरु मेमोरीयल हॉलकडे जाणारी तसेच नेहरु मेमोरीयल हॉल ते साधु वासवाणी चौक अशी वाहतुक थांबवुन रस्ता अडवुन जाणारे लोकांना इच्छीतस्थळी जाण्याचा मार्ग रोखला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एच.मचाले ९५६१४५७३३६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६७२/१८,भादविक १४३,१८८, महा.पो.का.क. ३७(१),१३५ |
| **फिर्यादी** | आनंद धनगर,पो.शि.कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते व इतर इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/१०/२०१८ रोजी सकाळी ०९/०० वा.चे सुमारास कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी यातील राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तात्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंढवा पो.स्टे. यांची झालेल्या बदलीच्या अनुशंगाने विनापरवाना बेकायदेशीर मुक मोर्चाचे आयोजन करुन इतर इसमांना नमुद मोर्चामध्ये सामील करुन घेवुन स्पीकरव्दारे भाषण करुन,रिक्षा व स्पीकरचा वापर करुन,पोलीस निरीक्षक गुन्हे, महादेव कुंभार यांनी दिलेल्या कोंढवा पोलीस स्टेशन गोपयीन जावक क्र.२३७०/१८ अन्वये दिनांक १८/१०/१८ रोजीचे सीआरपीसी कलम १४९ प्रमाणे नोटीसचा भंग करुन,मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर यांच्याकडील आदेश क्रमांक/पोसीआ/कावसु/६७२३/२०१८ दिनांक ०१/१०/१८ अन्वये दिनांक ०६/१०/१८ चे ००/०० वा ते दिनांक १९/१०/१८ रोजीचे २४/०० वा पर्यत दिलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चेतन मोरे ९८७०३२७७०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३७४/१८,भादविक ३२६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,३४,महा.पो.अधि.कलम ३७(१) |
| **फिर्यादी** | मनिषा हटकर, वय २८ वर्षे,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | १)अण्णा गायकवाड,रा.भिम शक्ती चौक, रामनगर वारजे,पुणे २)सागर गायकवाड, ३)तूषार ४)योग्या रा.भिम शक्ती चौक, रामनगर वारजे,पुणे, ५)किसन विटकर, ६)किसन विटकर चा मोठा भाऊ, ७)विकी शिरसाठ ८)सूनिल गुजाळ, सर्व रा,लक्ष्मी चौक, रामनगर वारजे,पुणे. (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०१८ रोजी रात्रौ १०/०० वा.चे.सुमारास. लक्ष्मी चौक रामनगर वारजे.पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हया घरी असताना फिर्यदी यांचा भाचा मंगेश याने येवुन सांगीतले कि, मी लक्ष्मी चौकातून माझे दुचाकिवरून येत असताना इसम नामे विकी शिरसाठ, किसन विटकर व सूनिल गुंजाळ यांनी त्याला आडवुन,मागच्या भांडणाचा राग काढुन,शिवीगाळी केली असे सांगीतल्याने फिर्यादी व त्यांचा भाऊ, भाचा, वहिणी असे त्या तिघांना जाब विचारण्यासाठी लक्ष्मी चौक,रामनगर येथे गेलो असता यातील नमुद इसमांनी शिवीगाळी करीत त्यांचे अंगावर सिमेंटचे तुकडे व विटा फेकुन मारु लागल्याने ते भिंतीच्या आडोश्याला थांबलो असता ते त्यांच्याकडे पळत येवून फिर्यादी यांचे भावाला पकडले व त्याला स्टिलच्या रॉडने व लाथा बुक्क्याने मारत असताना फिर्यादी हे त्याला वाचविण्यास गेले असता विकी शिरसाठ याने फिर्यादी यांना पकडले व किसन विटकर याने त्यांचे डोक्यात विठ मारली त्यामुळे फिर्यादी यांचे डोक्यावर जखम होवून रक्त येवू लागले. फिर्यादी यांचे भावाला रॉड व कोयत्याच्या उलटया बाजुने व विटाने मारहान केल्याने तो जखमी झाला, तसेच फिर्यादी यांचे वहिणीला स्टीलच्या रोडने मारहान करून दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एम.निकम ९८२३२०७७४६ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३८२/१८,भादविक ४२०, महिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(अ)(ड) |
| **फिर्यादी** | ऊमेशकुमार पराते, वय ४१ वर्षे,रा.आंबेगाव बु//,पुणे |
| **आरोपी** | खोशी कुमार, वय २८ वर्षे,रा.कारु रविदास फ्लॅट नं.९०८, एफ/एफ, जनता फ्लॅट बी.सेक्टर १६ बी, व्दारका सेक्ट६, दक्षिण –पश्चिम, दिल्ली (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/२०१८ रोजी ते दि.११/०९/२०१८ रोजी महाराष्ट्र बँक टिळक रोड शाखा, सदाशिव पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी नमुद बँकेस सह महाप्रबंधक म्हणुन नोकरीस असुन,वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादी यांचे महाराष्ट्र बँकेचे खातेधारक श्रीकृष्ण सर्जीकल खाते वरुन यातील नमुद इसमाने नमुद खातेधारकाचे नावाने बनावट ई-मेल आयडी तयार करुन, त्याव्दारे स्वतःचे बँकेचे खातेधारक आहे असे बँकेस भासवुन, बँकेस नवीन ई-मेल आयडी व मोबाईल नंबर देवुन तो अद्ययावत करण्यास सांगितला. त्याप्रमाणे खातेधारकाचा नवीन ई- मेल आयडी व मोबाईल नंबर अद्ययावत झाला असता यातील नमुद इसमाने खातेधारकाचे खात्यावरुन त्यांचे संमतीशिवाय अनाधिकृतपणे स्वतःचे फायदयाकरीता ४१ गैर आर्थिक व्यवहार करुन, खातेधारकाची व महाराष्ट्र बँकेची एकुण ११ लाख ९९ हजार ३८८/- रु.ची ऑनलाई माध्यमाव्दारे आर्थिक फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा अर्ज चौकशीवरुन दाखल करण्यात आला आहे. ) |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) के.व्हि.इंदलकर ९८३४२९८८८३ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७५९/१८,भादविक ४२० महिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला, वय २७ वर्षे,रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०३/२०१८ रोजी ते दिनांक १६/१०/२०१८ रोजी दरम्यान फ्लॅट सिस्टीम प्रा.लि. |

कंपनी,युनिट २०१ ते २०३, २१२ ते २१५ दुसरा मजला वेस्ट विंग,न्याती युनिटी,नगर रोड, येरवड, पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हया ग्लॅट सिस्टिम्स प्रा.लि. पत्ता युनिट २०१ ते २०३, २१२ ते २१५ दुसरा मजला वेस्ट विंग,न्याती युनिटी,नगर रोड, येरवड, पुणे या कंपीनीमध्ये कंपनी सेक्रेटरी पदावर नोकरीस असून,परदेशी कंपन्याचे बिल पेमेंट करण्याचे काम पाहतात,साका इंटरनॅशनल लि.कंपनी ही बांग्लादेशमध्ये असून ती कंपनी ग्लॅट सिस्टीम्स प्रा.लि. कंपनीचे मशिन विक्रीचे बांग्लादेशातील विक्रीचे एजंट म्हणून काम पाहते ग्लॅट सिस्टिम्स प्रा.लि. नियमितपणे साका इंटरनॅशनल बरोबर कमिशनल व्यवहार करते त्यांचे व्यवहार हे ई मेल व टेलीफोन व्दारे चालतात.नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने नियोजनबध्द फसवणुक करण्याचे उद्देशाने फिर्यादी त्यांच्या ग्लॅट सिस्टीम्स प्रा.लि. कंपनी आणि साका इंटरनॅशनल लि.कंपनी या दोन्ही कंपन्याचे बनावट ई मेल आयडी तयार करून त्या ई मेलव्दारे दोन्ही कंपन्यांची गोपनिय माहिती चोरून फिर्यादीचे कंपनीस चुकीचे बँक अकाऊंट डिटेल्स ई-मेल व्दारे देवून फिर्यादीचे कंपनीस १,६१,१७,५९१/- रुपये ६४ पैसे (एक कोटी एकसष्ट लाख सतरा हजार पाचशे एक्यान्नव रुपये चौशस्ट पैसे) त्यांचे बनावट बँक अकाऊंटवर पाठविणेस भाग पाडून ऑनलाईन फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी. (गुन्हे) किरण बालवडकर  ९४२१२६२०७४

## पोलीस स्मृतिदिन २१ ऑक्टोबर २०१८

दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जातो. या दिवशी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावित असताना कामी आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस दलातर्फे मानवंदना देऊन श्रध्दांजली वाहण्यात येते. हा दिवस पोलीस दलाला अभिमानाचा, शौर्याला मानवंदना देण्याचा,त्याचबरोबर आपल्या जुन्या सहका-यांच्या स्मृतीने मन हेलावणाराही असतो.

२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जाण्यास १९५९ मध्ये लडाख भागातील सरहद्दीवर झालेली घटना कारणीभुत ठरली. भारत चीन सरहद्दीवर लडाख भागात १८ हजार फुट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज नावाचे ठिकाण आहे. २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉट स्पिंग्ज येथे गस्त चालु होती. गस्ती तुकडी नेहमी प्रमाणे गस्त घालण्यासाठी कुच करत हॉट स्पिंगच्या पुर्वेला ६ मैल दुर ती आली असताना पर्वताच्या डावे बाजुला तुकडीच्या नेत्याला काही काही संशयास्पद खुणा दिसल्या. तुकडी त्या खुणांच्या अनुरोधाने पुढे चालु लागली आणि
अचानक भयानक गोळीबार सुरू झाला. त्याठिकाणी पोलीस वीरांनी शौर्याने तोंड दिले. ही विशेष लढाई लढता लढता यापैकी १० गस्ती शिपायांना वीरमरण आले व ९ जण जखमी अवस्थेत शत्रुच्या हाती सापडले. हे १० अमर शिपाई होते पुरणसिंग, धरमसिंग, इंद्रजित सुबा, नोरबु लामा, शिवनाथ प्रसाद, त्शेरिंग नोरबु, इमामसिंग, सवन सिंग, बेगराज आणि माखनलाल असे होते. त्यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीवरही अचानक चिनी सैन्यांनी हल्ला केला होता. या लढाईत कामी आलेल्या या शुर पोलीस जवानांपैकी पश्चिम बंगालचे -३, हरियाणा – २, पंजाब-२, उत्तर प्रदेश-२, हिमाचल प्रदेश-१ असे होते. ही बातमी वा-यासारखी सा-या देशभर पसरली. १३ नोव्हेंबरला चिनी सैनिकांनी या हुतात्म्यांचे मृतदेह भारताच्या ताब्यात दिले. १४ नोव्हेंबरला सकाळी ०८/०० वा. हॉट
स्प्रिंग्ज येथे त्यांच्यावर सन्मानपुर्वक अंत्यविधी करण्यात आले. त्यावेळी प्रत्येक राज्यातील पोलीस दलांनी त्या त्या ठिकाणी या वीरांना श्रध्दांजली अर्पण केली.

त्यानंतर पाटणा येथे १९५९ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस स्पर्धांच्या वेळी सर्वांनी **‘आमच्या हया वीर हुतात्म्यांचे स्मरण आम्ही दरवर्षी २१ ऑक्टोबरला पोलीस हुतात्मा दिन पाळुन करू’** अशी शपथ घेतली,आणि तेव्हापासुन दरवर्षी हा दिन भारतवर्षात

मोठया सन्मानाने **‘पोलीस हुतात्मा दिन’** म्हणुन पाळण्यात येतो. राज्या-राज्यातुन पोलीस दले या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी संचलन आयोजीत करून त्यांना मानवंदना देतात.

दि.१ सप्टेंबर २०१७ ते ३१ ऑगस्ट २०१८ या कालावधीत देशातील सर्व राज्यात पोलीस दलाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण **४१४** जणांनी आपले कर्तव्य बजावित असताना देह धारातीर्थ ठेवले. त्यामध्ये महाराष्ट्रातील **१.पो.हवा.२३०७२,सुनिल दत्तात्रय कदम २.पो.हवा.२७२,सुरेश दत्तात्रय गावडे ३.पो.कॉ. १५८९,सतिश श्रध्दाराव मडवी** अशा एकुण **०३** या पोलीस जवानांचा समावेश आहे.

दिनांक २१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०८/०० वा. पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे **मा.पद्मविभुषण डॉ.रघुनाथ अनंत माशेलकर (ज्येष्ठ शास्त्रज्ञ)** हे प्रमुख अतिथी म्हणुन वरील हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करणार आहेत.

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की,आपण पोलीस हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी **दि.२१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०७/५० वा.** उपस्थित राहावे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

## COMMEMORATION DAY PARADE

**21st October, 2018**

*To,*

*Smt./Shri.* सर्व प्रसार माध्यमांचे

प्रतिनिधी.

*From :*

*The Commissioner of Police,*

*Pune City.*

---

# पोलीस स्मृतिदिन संचलन

# २१ ऑक्टोबर, २०१८

## Police Commemoration Day Parade

## 21st October, 2018

## पुणे शहर पोलीस आयुक्तालय

रविवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता
पोलीस संशोधन केंद्र, पाषाण, पुणे येथे

## पोलीस स्मृतिदिन संचलनास

आपणास उपस्थित राहण्याची विनंती करीत आहे.

## पद्मविभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर

(जेष्ठ शास्त्रज्ञ)

हे पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करणार आहेत.

पोषाख : राष्ट्रीय / समारंभीय     पोलीस अधिकारी : रिव्ह्यू ऑर्डर टाईप बी

कृपया ही निमंत्रण पत्रिका सोबत आणावी आणि सकाळी ७.५० वाजणेपूर्वी आसनस्थ व्हावे.

---

## Pune City Police Commissionerate

Solicit your presence
at

## Police Commemoration Day Parade

On Sunday, the 21$^{St}$ October 2018 at 8.00 a. m.
at the Centre for Police Research,
Pashan, Pune.

## Padma Vibhushan Dr. Raghunath Anant Mashelkar

(Eminent Scientist)

**has kindly consented to lay the wreath.**

**Dress : National/Formal**     **Police Officers : Review Order Type B**

Requested to kindly Carry this card and be seated before 7.50 a. m.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर